Dr. Manjiri Bhalerao, Associate Professor & Head Shri Balmukund Lohia Centre of Sanskrit & Indological Studies, was awarded with the ‘Vocational Excellence Award’ by Rotary Club of Pune, Shivajinagar, on 20th May 2024.



Rotary IN DISTRICT 3131

CLUB NO. 22422

# रोटरी क्लब ऑफ पुणे शिवाजीनगर

## व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार

## मानपत्र



डॉ . मंजिरी भालेराव

माननीय डॉ. मंजिरी भालेराव (विभागप्रमुख, श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीयविद्या अध्ययन केंद्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे) यांस,

भूतकाळाचा दुवा वर्तमानाशी जोडणाऱ्या आपण, प्राचीन संस्कृतीचा प्रवाह आमच्यासाठी दृग्गोचर करता याबद्दल आम्ही आपले ऋणी आहोत. इतिहास, पुरातत्त्वशास्त्र, भारतीयविद्या (इंडॉलॉजी), प्राकृत, संस्कृत या क्षेत्रातील आपले ज्ञान तसेच बौद्ध धर्म, प्राचीन भारतीय कला व स्थापत्य, पुराभिलेखविद्या, नाणकशास्त्र, मूर्तिशास्त्र, प्राचीन भारतीय साहित्य या क्षेत्रातले आपले संशोधन खरोखर थक्क करणारे आहे. त्यामुळे देशातल्या अति महत्त्वाच्या प्रकल्पांच्या समन्वयक, सह समन्वयक, सल्लागार, संपादक अशा उच्च पदांची जबाबदारी घेण्यास आपल्याला आदरपूर्वक आमंत्रित केले जाते. इयत्ता तिसरी, सहावी आणि दहावीच्या पाठ्यपुस्तकांच्या संपादनासाठी बालभारतीच्या संपादक मंडळाच्या आपण सन्माननीय सदस्य आहात. आपण अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि प्रादेशिक चर्चासत्रामध्ये सहभागी होऊन आपले शोधनिबंध सादर केले आहेत. आपली अनेक पुस्तके आणि संशोधन निबंध प्रकाशित झाले आहेत. अनेक ठिकाणच्या उत्खननात आपला प्रत्यक्ष सहभाग होता. आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा लाभ आपण अनेक विद्यापीठांतील विद्यार्थ्यांना अध्यापनाद्वारे देत आहात, तसेच कित्येक पदव्युत्तर आणि पीएच. डी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहात. आपल्या कार्याबद्दल आपल्याला सह्याद्री गौरव पुरस्कार, सुमन वैद्य आदर्श शिक्षिका पुरस्कार, नामांकित संस्थांतर्फे जीवन गौरव पुरस्कार, लागोपाठ तीन वेळा जागतिक महिला दिनी सन्मान अशा विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

'प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृती' या क्षेत्रातील आपल्या अमूल्य योगदानाबद्दल आणि आपल्याच देशाच्या इतिहासाचे आणि संस्कृतीचे आम्हाला भान देण्याच्या आपल्या या उदात्त कार्याबद्दल आपला ऋणनिर्देश करण्यासाठी 'रोटरी क्लब ऑफ पुणे शिवाजीनगर' च्या वतीने आपल्याला हे मानपत्र अर्पण करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

सोमवार, दि. २० मे २०२४

| रो.डॉ. स्मिता जोग | रो. सचिन जोगळेकर | रो.डॉ. भारती डोळे |
|---|---|---|
| प्रेसिडेंट | डायरेक्टर व्होकेशनल सर्व्हिसेस् | सेक्रेटरी |